'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015) Vol. 2 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec.- 2015

# मराठी आणि तिच्या बोलीभाषा

**प्रा. डॉ. शिरीष पाटील,**
**कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,**
**जामनेर, ता. जामनेर जि. जळगाव**
**महाराष्ट्र, भारत.**

***मानवी संस्कृतीचा खऱ्या अर्थाने सुसंस्कृतपणे अभ्यास करायचा असेल तर विविध ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या प्रांतनिहाय महत्वपूर्ण बोलीभाषांची संवर्धन व संरक्षण शासकीय पातळीवरुन करावे लागेल. या बोली बोलणाऱ्या लोकांच्या मनात न्यूनत्वाची भावना राहणार नाही याचीही काळजी घेणं गरजेचे आहे. अभ्यासकांनी शिष्ट भाषा हीच श्रेष्ठ भाषा आहे असा गवगवा न करता बोली जिवंत राहिल्या तर भाषा जिवंत राहतील, संस्कृती जिवंत राहिल. व भाषिक चैतन्याचा जिवंत झरा सतत वाहत राहिल हे पाहणे महत्त्वाचे आहे.***

महाराष्ट्रात मराठी ही प्रामुख्याने बोलली जाणारी भाषा आहे. तिचे क्षेत्र व्यापक आहे. मोठ्या भूभागावर ती बोलली जाते. या विस्तीर्ण क्षेत्रात नैसर्गिकदृष्ट्या काही भाग पडलेले आहेत. विशेषत: कोकण प्रांत सह्याद्रीमुळे अलग झाल्याने तो स्वंयमेव असा घटक वाटतो. तर वऱ्हाड भाग विस्तृत, सपाट, मैदानी असल्यामुळे महाराष्ट्राचा दुसरा घटक वाटतो. हे निसर्गनिर्मित घटक जरी एका भाषा क्षेत्राचे भाग असले तरी परस्परांमध्ये थोडेसे अंतर देखील आहे. त्यामुळे एका भागाची भाषा दुसऱ्या भागापेक्षा निश्चितच वेगळी आहे, भिन्न आहे. याबरोबरच महाराष्ट्राची सीमा दुसऱ्या प्रदेशास मिळालेली आहे तेथे भिन्न भिन्न भाषेचे शब्द मिळून भाषा भेद निर्माण झाले आहेत. मराठी जरी संपूर्ण महाराष्ट्रात बोलली जात असली तरी बोलण्यात एकरुपता नाही. तिथे भाषेचे प्रांतिक भेद निश्चितपणे दिसून येते. मराठी भाषेची जितकी रुपे आहेत तितक्या बोली समजावयास हरकत नाही. बोली आणि भाषा यांचा संबंध लक्षात घेवूनच ही रुपे मांडली गेली आहेत. त्यामुळे मराठी आणि तिच्या बोलीभाषा यांचा अभ्यास करताना भिन्नभिन्न समूहाची प्रकृती, भाषिक समज, बोलींचा प्रभाव या गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे.

मराठी भाषेची प्रमुख रुपे, प्रांतिक भेद यांना आपण उपभाषा (कोणत्याही भाषेच्या क्षेत्रात अधिक जवळ असलेले बोलींचे समूह जे एका क्षेत्रात बोलले जातात) ते त्या क्षेत्रातल्या मानक भाषेपेक्षा भिन्न असतात. उपभाषा यामध्ये अनेक बोलींचा समूह निश्चितपणे असतो. भाषा क्षेत्रात जर दहा बोली असतील आणि त्यामध्ये आपापसात जवळ असलेल्या काही भाषांचे मिळून तीन समूह बनत असतील तर त्या भाषा क्षेत्रात तीन उपभाषा झाल्या. मराठी भाषेत जवळजवळ १५ ते २० स्थानिक रुपे आहेत. पण भौगोलिक दृष्ट्या वर सांगितल्याप्रमाणे तीनच उपभाषा आहेत. कोकणी, वऱ्हाडी, मध्यवर्ती अशी ही विभागणी आहे. उपभाषांचे हे भेद प्रकार त्यांच्या वैशिष्ट्यांमुळे पडलेले आहेत.

कोकणी हे नाव भाषिक स्वरुपाचा सारखेपणा किंवा निकट संबंध दाखविणारे नसून केवळ भौगोलिक स्थान निश्चित करणारे आहे. महाराष्ट्राच्या पश्चिमी भागाचा घाट व अरबी समुद्र यांच्यामध्ये असलेल्या भागाला कोकण असे

म्हटले जाते. उत्तरेकडील सीमा दमण व दक्षिणेकडील गोव्यातील तरेखोल किंवा म्हैसूरचा प्रदेश मानला जातो. हा भाग कमी रुंदीचा व जवळजवळ ३०० मैल लांबीचा आहे. म्हणून याला कोकणपट्टी असे म्हणतात. यासंपूर्ण भागात अनेक बोली बोलल्या जातात. या सर्वांना कोकणी हे नाव दिले जाते. कोकणी ही विशिष्ट भाषा नसून त्या क्षेत्रात बोलल्या जाणाऱ्या सर्व समूहाला दिलेले नाव आहे. या भागात कोकणीचा प्रयोग अधिक होतो. शिवाय साहित्याची निर्मितीही होते. दैनिके, साप्ताहिके, मासिके प्रकाशित होतात. आकाशवाणीवरुन कोकणी कार्यक्रमही होतात. नाटक हा लोकप्रिय वाङ्मय प्रकार कोकणीतून सादर होतो. कोकणी ही मराठीपेक्षा तशी फारशी वेगळी नाही. ध्वनी आणि वाक्य रचना यात अगदी थोडेसे अंतर दिसून येते. उच्चारणात मात्र खूप फरक आहे. अनुनासिक रुपे अधिक तीव्रपणे जाणवतात. कोकणीचा प्रयोग व त्याच्या वेगळेपणामुळे काही लोक कोकणीला प्रांतिक भेद न मानता एक स्वतंत्र भेद मानतात. वास्तविकदृष्ट्या कोकणी ही मराठीचीच उपभाषा आहे. अभ्यासक तिला महत्वाची बोली मानतात. कोकणी भाषेचा विशेष अभ्यास डॉ. कात्रे यांनी The Foundation of Konkani या ग्रंथात केला आहे. त्यांनी या उपभाषेच्या ६ बोली मानलेल्या आहेत. त्या म्हणजे, कर्नाटक किंवा चित्रपूर सारस्वतांची कोकणी, गौंड सारस्वतांची कोकणी, श्री वालावलीकर उर्फ शणै गोयबाब यांच्या लेखणातून प्रामुख्याने प्रत्ययाला येणारी गोव्याच्या उच्चवर्णिय हिंदूंची कोकणी, मंगळूर आणि दक्षिण कर्नाटक जिल्ह्यातील ख्रिश्चनांची कोकणी, उत्तर कर्नाटक जिल्ह्यातील ख्रिश्चनांची कोकणी आणि गोव्याच्या ख्रिश्चनांची कोकणी. हे सगळे भेद जाती किंवा विशिष्ट समाजावर आधारीत आहेत. भौगोलिकदृष्ट्या कोकणीचे फक्त दोनच भेद पडतात. उत्तर कोकणी, दक्षिण कोकणी.

उत्तर कोकणी आणि पुण्याची मध्यवर्ती मराठी बोली या दोघांमध्ये विशेष असा फरक दिसत नाही. उत्तर कोकणीमध्ये प्रदेशाप्रमाणे बोलणाऱ्या लोकांच्या जातीप्रमाणे किंवा तिथल्या संस्कृतीप्रमाणे त्याचबरोबर लोकांच्या धंद्याप्रमाणे आणखी काही पोटभेद पडलेले दिसून येतात. बाणकोटी, दमणी, घाटी, मावळी, संगमेश्वरी इत्यादी पोटभेद तिथल्या स्थानावरुन पडले असून आग्री, भंडारी, धनगरी, कऱ्हाडी, कोळी, कुणबी, ठाकरी, परभी इत्यादी पोटभेद तिथल्या जातीवरुन व धंद्यावरुन पडलेले आहेत. सामान्यत: प्रांतिक आणि जातीक पोटभेदात उच्चारण व व्याकरण सारखेच दिसून येते. बाणकोटी बोली ही बाणकोटच्या आसपास बोलली जाते. या भागात पूर्वी मुस्लीम लोकवस्ती होते. त्यामुळे या बोलीवर उर्दूचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. उर्दू शब्दावली प्रमाणे उर्दू वाक्य रचना आणि उच्चार पध्दतीचा परिणाम या बोलीवर झालेला दिसून येतो. त्यामुळे ती वैशिष्ट्य पूर्ण ठरते. तर मावळी बोलीही मावळ खोऱ्यात बोलली जाते. घाटी बोली कोकण प्रांत लगतच्या सह्याद्रीच्या घाटावर बोलली जाते. छोट्या छोट्या समूहांमध्ये याबोली प्रभावी ठरतात. त्यावर मराठी भाषेचा प्रभाव निश्चितपणे जाणवतो. यामध्ये संगमेश्वरी ही महत्वाची बोली गणली जाते. रत्नागिरी जिल्ह्यातील देवरूख तालुक्यातील लोकांची संगमेश्वरी ही बोली आहे. या लोकांच्या बोलण्यात घ्ए'आणि घ्ओ'हे दोन्ही स्वर ऱ्हस्व आणि दीर्घ अशा दोन्ही पध्दतीने उच्चारले जातात. उदा. देखिल आणि दिखिल हे दोन्ही उच्चार

रुढ आहेत. दर्शक सर्वनाम आणि संबंधी सर्वनाम ह्यांचे पुल्लिंगी एक वचन ह्या बोलीत चमत्कारिक रीतीने करतात. उदा. हा, ता, जा, असणे इत्यादी धातूंची रुपे 'हाँय', 'हाँव'असे होतात. त्यामुळे ही भाषा ऐकताना चमत्कारित वाटते व त्यामुळेच हे भाषा भेद रूढ होतात.

उत्तर कोकणी व दक्षिण कोकणी या दोघांमध्ये दक्षिण कोकणी अधिक नावारुपाला आली आहे. मध्यवर्ती मराठी भाषेपासून ही भाषा वेगळी तर दिसतेच शिवाय तिच्या आसनवर्ती ज्या इतर कोकणी बोली आहेत त्यांच्यापासूनही भिन्न दिसते. १५ व्या शतकापासून पोर्तुगजांचा आणि तेथील लोकांचा अतिशय जवळचा संबंध आल्याने हा संबंध फक्त राजकीय बाबतीच प्रभावी राहिला नाही तर भाषिक बाबतीत देखील प्रभावी राहिला. तेथील लोकांची भाषा पोर्तुगीज लोकांच्या भाषेकडून प्रभावित झाली. सूक्ष्मदृष्टीने निरिक्षण केले असता दक्षिण कोकणात सगळीकडे एकसारखी भाषा बोलली जात नाही. प्रत्येक प्रांतात थोडा अधिक फरक दिसून येतो. प्रांत, धंदा, संस्कृती या कारणांमुळे दक्षिण कोकणीचेही पोटभेद पडलेले आहेत. येथील लोकांचे उच्चारण बरेचसे नासिक्य आहे. तसेच प्रत्येक शब्दाच्या शेवटी अ सारखा ऱ्हस्व स्वर जोडण्याची लकक येथील लोकांमध्ये दिसून येते. म्हणूनही ती भाषा मराठी भाषा समूहात वेगळी बोली मानली जाते. उत्तर आणि दक्षिण कोकणी या दोन बोलींची जी सीमा आहे त्या सीमेवर कुडाळी बोली बोलली जाते. पूर्वी या बोलीचा प्रदेश उत्तरेस दाभोळपर्यंत व दक्षिणेस गोव्यापर्यंत येत होता. मात्र सध्या देवगडपासून दक्षिणेस गोव्यापर्यंतचा भाग यामध्ये येतो. कुडाळी भाषेवर मराठी भाषेचा प्रभाव अधिक आहे. ही भाषा बोलणारे लोक अधिकतर शुध्द मराठी शब्दांचा प्रयोग करतात. मात्र या शब्दांचा प्रयोग करताना कुडाळी बोलीचे विशिष्ट विभक्ती प्रत्यय व क्रियापदांची रुपे वापरुन विशिष्ट हेल काढून उच्चार करीत असतात. या बोलीत लिहिले गेलेले वाङ्मय बहुतांश ज्यानपद स्वरुपाचे आहेत. कुडाळी बोलीचे विशेष म्हणजे मराठीत ज्या शब्दाच्या शेवटी 'इ'अक्षर येते त्याठिकाणी कुडाळी 'य'रुप येते उदा. समई - समय, चतुराइ - चतुराय इत्यादी. कुडाळीत आकारान्त नामे ओकारान्त व एकारान्त नामे आकारान्त उच्चारण्याची पध्दत दिसून येते. उदा. आंबा - आंबो, मूळा - मूळो, कोळमें - कोळायां, नाणें - नाणां इत्यादी. वैशिष्ट्यपूर्ण शब्द संपदा दिसून येते.

मराठी भाषेत प्रांतनिहाय बोली भेद जनमान्य झालेले आहेत. कोकणीप्रमाणेच वऱ्हाडी बोली ही वैशिष्ट्यपूर्ण व मोठ्या समूहाची बोली म्हणून ओळखली जाते. उत्तर सीमेवरील वऱ्हाडी बोलीभाषा ही बुलढाण्याच्या पूर्व भागात ऐलिचपूर, बैतूल, शिवणी, बालाघाट या प्रदेशाच्या दक्षिण भागात त्याशिवाय चांदा, भंडारा आणि वाशिम या प्रदेशात बोलली जाते. यावरुन या बोलीचे क्षेत्र विस्तृत असल्याचे दिसून येते. या बोलीचे येथील लोकांच्या जाती, धंदा, प्रदेश या घटकांवरुनही घाटावरची वऱ्हाडी आणि घाटा खालची वऱ्हाडी असे दोन भेद दिसून येतात. याशिवाय आणखी नागपूरी, हळबी, बालाघाटी, धनगरी, कुणबी असे अनेक भाषा उपभेद पडलेले आहेत. या प्रत्येक मध्यवर्ती वऱ्हाडीपासून काही सूक्ष्म भेद दिसून येतात. नागपूरच्या आसपास नागपूरी बोली बोलली जाते. वऱ्हाडीत मुख्यत: दीर्घ स्वार ऱ्हस्व उच्चारले

जातात. उदा. मी - मि, तसेच इ किंवा व बद्दल ए किंवा य वर्ण येतात. उदा. दिले - देल्ल, धल्ल, इक, येळ - वेळ इत्यादी वऱ्हाडी बोलीत अनुनासिकांचा उच्चार स्पष्टपणे केला जातो. तसेच या बोलीत न बद्दल ण चा प्रयोग आढळतो. तर नागपूरी बोलीत ही प्रक्रिया उलट दिसून येते. उदा. कोण - कोन, नाणे - नाने इत्यादी. वऱ्हाडीत घ्एँ'कारान्त ते अकारान्त होते. उदा. पोरगे - पोरग. अशा प्रकारचा लिंगांचा घोटाळा चांदा, भंडारा, अकोला येथील लोकांच्या बोलीतही दिसून येतो. त्याचबरोबर व्याकरणातील चतुर्थीला ला प्रत्ययाऐवजी ले प्रत्यय याचा वापर केला जातो. उदा. 'मी जातो'असा शब्द प्रयोग स्त्रीयांकडून केला जातो. त्यामुळे ही भाषा ऐकताना मोठी मजेशीर वाटते.

मध्यप्रदेशातील बस्तर, कांकेर, चांदा, भंडारा, रायपूर या भागात राहणाऱ्या हळद लोकांची ही हळबी बोली होय. या बोलीचा प्रांतिक भेद म्हणून विशेष उल्लेख केला पाहिजे. ही बोली बोलणारे लोक मूळचे अनार्य असून त्यांनी आर्य भाषेचा प्रभाव स्विकारला. या बोलीत मराठी, बंगाली, उडिया, छतिसगढी या भाषांचे मिश्रण आहे. तसेच हिंदी शब्दांचे प्रमाणही अधिक आहे. शब्द हिंदुस्थानी व प्रत्यय मराठी लावण्याची पध्दत असल्यामुळे हळबीला मराठीचीच उपभाषा म्हणणे अधिक सोइस्कर होईल. या बोलीत तालव्य व्यंजन हिंदीप्रमाणेच वापरण्याची पध्दत आहे. नामाचे सामान्य रुप त्या बोलीत होत नसून नामालाच विभक्ति प्रत्यय लावण्याचा प्रघात दिसून येतो. तसेच मइ - मे, आमी - हमनन इत्यादी. या बोलीतील षष्ठीच्या व भूतकाळाच्या प्रत्ययांत नामाच्या विभक्तीच्या रुपांत व इतर काही रुपांत निरनिराळ्या भाषांचा ठसा उमटला असल्याने या बोलीस मराठीची पोटबोली समजण्याबद्दल अभ्यासकांमध्ये शंका उपस्थित झाली आहे. अर्थात असे मतभेद हे असतातच अभ्यासासाठी ते उपयुक्त ठरतात.

RESEARCH JOURNEY

मराठीतल्या बोली समूहातली प्रमुख बोली म्हणजे अहिराणी (खानदेशी) ही होय. या भाषेचे क्षेत्र मोठे विस्तीर्ण आहे. पूर्व पश्चिम खानदेश, उत्तर नाशिक जिल्हा, बऱ्हाणपूरपर्यंतचा प्रदेश हिच्या कक्षेत येतो. विशेष म्हणजे हे भूप्रदेश निसर्गनिर्मित अडथळ्यांनी परिपूर्ण असल्याने या बोलीमध्ये बरेच पोटभेद निर्माण झालेले आहेत. शिष्ट मान्यता, अभिजातपणा किंवा लेखनतंत्र या गुणांच्या अभावामुळे या बोलीला स्थैर्य प्राप्त झाले नाही. उत्तर खानदेश हा भिल्लं, कातकरी यासारख्या जमातींचा प्रदेश आहे. तर उत्तरेकडील पंजाब सिंध भागातून आभीर या नावाच्या रानटी जमातीच्या लोकांनी वसाहती केल्या. हे लोक जी भाषा बोलत त्या भाषेला अहिराणी किंवा आभीरांची भाषा असे नाव पडलेले आहे. नेमाड, नाशिक इत्यादी ठिकाणी आभीर लोकांची वस्ती विस्तृत असल्याने या भाषेचा विस्तार अधिक प्रमाणात आढळतो. खानदेशच्या उत्तरेकडचा भाग गुजराथला लागून असल्याने खानदेशी भाषा ही मराठी भाषेची बोली आहे की गुजराती भाषेची याबद्दलही मोठ्या प्रमाणात मतभेद आहे.

खानदेशी भाषेत 'स'बद्दल 'छ'चा प्रयोग केला जातो. उदा. सोड - छोड, सावली - छावली इत्यादी तसेच 'ण'ऐवजी 'न'येतो. उदा. पाणी - पानी, पण - पन, जाणे - जाने इत्यादी. तालव्य वर्ण खानदेशीमध्ये मृदू उच्चारला

'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015) Vol. 2 Issue. 4
ISSN :2348-7143 (Online)
Oct. - Dec.- 2015

जाण्याचा प्रघात आहे. ज्या ज्या ठिकाणी महाप्राणयुक्त वर्ण येतात त्या त्या ठिकाणी महाप्राण गाळून टाकण्याचा प्रघात आहे. उदा. आम्ही - आमी, तुम्ही - तुमी. खानदेशीमध्ये एकवचनाचे प्रत्ययास 'स' आगम लावून अनेकवचनाचे प्रत्यय तयार करतात. या भाषेत मध्यवर्ती मराठीप्रमाणेच तिन्ही लिंगांचे शब्द व वचने समान आहेत. पण प्रत्ययांमध्ये मात्र फरक दिसून येतो. अलिकडे अहिराणीत मोठ्या प्रमाणावर खानदेशात संशोधन झाले आहे. अभ्यासकांनी तिला स्वतंत्र बोलीचा दर्जा द्यावा, ती मराठीपेक्षा प्राचीन आहे त्यामुळे तिला कोकणी भाषेला मिळालेला जो शासकीय दर्जा आहे तो मिळावा असे प्रयत्न सुरु आहेत. एकमात्र निश्चित की ही बोली मोठ्या प्रमाणात आता अभ्यासली जात आहे.

मराठी भाषेच्या बोली प्रवाहात डांगीही बोलीभाषा सुध्दा येते. डांग भागात बोलली जाणारी डांगी बोली अहिराणीशी संलग्न आहे. साधारणतः हा प्रदेश गुजरात व महाराष्ट्राच्या सीमेवर येतो. डोंगराळ व दाट जंगलांनी व्यापलेला हा प्रदेश भिल्लं, वारली, कोकणी या आदिवासी लोकांनी आपल्या वास्तव्याने व्यापलेला आहे. या भागात राहणाऱ्या लोकांची बोली म्हणजे डांगी बोली होय. या बोलीच्या बाबतीतही विद्वानांमध्ये मतभेद आहे. विद्वानांच्यामते ही बोली मराठीची पोटभाषा आहे याचे मुख्य कारण म्हणजे व्याकरणदृष्ट्या या बोलीत मराठी भाषेचीच अधिक लक्षणे दिसून येतात. उदा. मराठीप्रमाणेच डांगीमध्येही हा, तो, जो ही सर्वनामाची रुपे तिन्ही लिंगांत भिन्न आहेत. त्याचप्रमाणे शब्दयोगी अव्ययाचा प्रयोग मराठीप्रमाणेच केला जातो. तथापी या बोलीचा प्रदेश गुजरात व महाराष्ट्र प्रदेशांच्या सीमेवर येत असल्यामुळे साहाजिकच या बोलीवर दोन्ही भाषांचा प्रभाव कमी जास्त प्रमाणात दिसून येतो. याचा विस्तार जवळजवळ ६५० चौरस मैलांचा असून या प्रदेशात राहणाऱ्या लोकांची वस्ती ४०,००० पर्यंत आहे. त्यामुळे हीसुध्दा मराठीची एक प्रमुख बोली म्हणून गणली जाते. एवढ्या मोठ्या लोकसमूहाला या बोलीबद्दल निश्चितच आत्मीयता असणे स्वाभाविक आहे.

या प्रमुख बोलींच्या प्रवाहात मध्यवर्ती मराठी भाषा पुणे, नगर, नाशिक, सोलापूर, कोल्हापूर, अक्कलकोट, भोर, फलटण, औंध, मिरज, सांगली या भागात बोलली जाते. या मध्यवर्ती भाषेत प्रांतपरत्वे विशेष भेद आढळून येत नाही. जे काही आढळतात ते अगदी सूक्ष्म आहे. नाशिकच्या भाषेवर काही प्रमाणात खानदेशी भाषेचा तर मुंबईतील भाषेवर उत्तर कोकणीचा, सोलापूर कोल्हापूर कडील भाषेवर कानडी भाषेचा प्रभाव दिसून येतो. सातारा, नगर याकडील भाषेवर देशस्थी मराठीचा पगडा दिसतो. मात्र किरकोळ भेद वगळता मध्यवर्ती मराठी ही वर उल्लेख केलेल्या सर्व भागांमध्ये जवळजवळ एकाच स्वरुपाची भाषा दिसून येते. मराठीच्या बोलींचा पोट बोलींचा जो काही अभ्यास महाराष्ट्रभर वेगवेगळ्या स्तरावर होत आहे. त्यावरुन संपूर्ण बोली समूहाचे महत्व आपल्याला नाकारता येणार नाही. उलट जेवढ्या बोली समृध्द होतील तेवढी भाषा समृध्द होईल. प्रमाण भाषा जी शासनाची भाषा म्हणून मान्य झाली आहे तिचा विकास या बोलींवरच आहे. ग्रंथ, वाङ्मय, वृत्तपत्रीय भाषा या सर्व प्रक्रियेमध्ये प्रमाण भाषेचा वापर केला जातो. बोलींचा वापर करणारे व बोलणारे लोक शिष्ट भाषा म्हणून प्रमाण भाषेचा स्विकार करतात. बोलीभाषा या ग्राम्य व कमी महत्वाच्या

आहेत असा समज कुणीही करु नये. उलट बोली भाषा जिवंत राहण्यासाठी त्यांचा अधिक अधिक प्रचार व प्रसार करणे, त्यांच्यात ग्रंथ निर्मिती करणं, आणि त्यातून लोकसमूहाची बोलीभाषा अभ्यासणं निश्चितच महत्वपूर्ण आहे. मराठी भाषा जर समृध्द करायची असेल तर विविध लोकसमूहाच्या बोलीभाषा बारकाईने अभ्यासून त्यातली लोकसंस्कृती अधिक समृध्द करणे, नव्या पिढ्यांसाठी बोलीतील शब्दकोश तयार करणे व बोलीभाषेच्या विस्तारीकरणासाठी सक्षमीकरणासाठी अभ्यासकांनी प्रयत्न करणे ही खरी काळाची गरज आहे.

मानवी संस्कृतीचा खऱ्या अर्थाने सुसंस्कृतपणे अभ्यास करायचा असेल तर विविध ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या प्रांतनिहाय महत्वपूर्ण बोलीभाषांची संवर्धन व संरक्षण शासकीय पातळीवरुन करावे लागेल. या बोली बोलणाऱ्या लोकांच्या मनात न्यूनत्वाची भावना राहणार नाही याचीही काळजी घेणं गरजेचे आहे. अभ्यासकांनी शिष्ट भाषा हीच श्रेष्ठ भाषा आहे असा गवगवा न करता बोली जिवंत राहिल्या तर भाषा जिवंत राहतील, संस्कृती जिवंत राहिल. व भाषिक चैतन्याचा जिवंत झरा सतत वाहत राहिल हे पाहणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी मराठी व तिच्या बोली, पोटबोली या सर्वांचा वेगवेगळ्या पातळ्यांवर सतत अभ्यास करणे व त्याबद्दल जनसमूहामध्ये जागृती निर्माण करणे निश्चितच महत्वपूर्ण कार्य ठरेल.

--------------*********---------------